**रे.दि.मु.नं. १८४/२०२२.**
नि.क्र.२८ लगत.
दि.१९.०७.२०२५

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा शपथेवर जबाब**

नाव :- **संगिता विजय शेंडे**

११. माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मला माझ्या वकीलांनी वाचून, समजून सांगितलेला असून तो माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-

**(एस.ए.विराणी)**
दि. १९.०७.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

**उलटतपास प्रतिवादी क्र. ४ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस. एस. गावडे यांच्यातर्फेः-**

१२. माझे शिक्षण इय्यता ७ वी पर्यंत झाले असून मला लिहीता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील मजकूर आणि प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझ्या पतीने आमच्या वकीलांना सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील व प्रतिज्ञापत्रातील मजकूर मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा कशासाठी दाखल केला हे मी सांगू शकत नाही. दावा मिळकतीला गट नंबर मला लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या चतुःसीमा माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचा जुना सर्वे नंबर मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील सर्व मजकूर माझ्या चुलत्यांनी वकीलांना सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील प्रतिज्ञापत्रातील मजकूर मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिज्ञापत्रावर मी सही केलेली आहे. त्यातील मजकूर मी वाचला होता. परंतु आता माझ्या लक्षात नाही. दावा मिळकत ही पूर्वी माझे चुलते किशोर लक्ष्मण म्हेत्रे यांच्या नावावर होती. साक्षीदार म्हणते, वडीलोपार्जित असल्यामुळे व चुलते मोठे असल्यामुळे त्यांच्या नावावर होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही माझे चुलते यांची खरेदी मालकीची होती. साक्षीदार म्हणते, आजोबा पणजोबांची होती.

१३. हे म्हणणे खरे आहे की, १९९३ साली माझ्या चुलत्यांनी दावा

मिळकत तहसिलदार यांच्यासमोर प्रतिवादी क्र. ४ व दिपक दशरथ म्हेत्रे यांच्या नावावर केली होती. साक्षीदार म्हणते, आमची संमती घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, १९९३ साली प्रतिवादी क्र. ४ च्या नावे दावा मिळकत केल्याबाबत मला माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, आदेश क्र. वाटप एसआर/३३४/१९९३ ज्याअन्वये दि. ०६.११.१९९३ रोजी दावा मिळकत प्रतिवादी क्र. ४ याच्या नावे झाली हे मला मान्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा आदेश या दाव्यामध्ये रद्द करुन मागितलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिपक दशरथ म्हेत्रे व किसन लक्ष्मण म्हेत्रे यांना या दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, १९९३ पासून दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. ४ याच्या ताबे वहीवाटीत आहे. साक्षीदार म्हणते, माझ्या आईवडीलांच्या ताबे वहीवाटीत आहे.

१४. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न १९८८ साली झाले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला दावा मिळकतीत वाटप मागण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे किती क्षेत्र आहे हे मी सांगू शकत नाही. साक्षीदार म्हणते, ९२ गुंठे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे एकूण क्षेत्र मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे निम्मे क्षेत्र माझा चुलत भाऊ दिपक दशरथ म्हेत्रे आणि निम्मे क्षेत्र माझा सख्खा भाऊ प्रतिवादी क्र. ४ यांच्या नावे आहे. सदर दावा मिळकतीचे त्यांच्यामध्ये आजतागायत फाळणीबारा आणि मोजणी झाल्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत प्रतिवादी क्र. ४ च्या नावे फेरफार क्र. ८५८ ने लागली ते फेरफार मला मान्य आहे.

१५. हे म्हणणे खरे आहे की, किसन लक्ष्मण म्हेत्रे, दशरथ लक्ष्मण म्हेत्रे, प्रतिवादी क्र. १ कुंडलीक लक्ष्मण म्हेत्रे हे तीन सख्खे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, किसन, दशरथ आणि कुंडलीक यांच्यामध्ये आजपर्यंत वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला दावा मिळकतीत वाटप मागण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत किसन लक्ष्मण म्हेत्रे यांच्या नावावर कशी आली याबाबतचा कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही.

१६. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई अंजनाबाई या माझे वडीलांची दुसरी पत्नी होती. साक्षीदार म्हणते, पहिली पत्नी होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत दिलेली वंशावळ ही चुकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ४ ची आई कुसूमबाई ही माझ्या वडीलांची पहिली पत्नी होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही एकत्र कुटुंबाची मिळकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. ४ यांची स्वतंत्र मालकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीची किंमत वाढल्यामुळे प्रतिवादींकडून पैसे उकळण्याकरिता खोटा दावा दाखल करुन खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

<u>**उलटतपास पुर्ण.**</u>

<u>**फेरतपास नाही.**</u>

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-
**(एस.ए.विराणी)**
दि. १९.०७.२०२५.
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.